Dr. Achyut V. Mane
M. A. Ph. D.
Ex. President
City Municipal Council, NIPANI.
Tal. - Chikodi Dist. - Belgaum.
Phone - Office : 20137 Resi : 20632

Date :- 26.6.98

प्र. पाठक,
मराठी विभाग,
देवचंद महाविद्यालय,
अर्जुननगर (जि. कोल्हापूर)

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री विनायक गंगाधर चव्हाण, यांनी " स्त्रीवादी दृष्टिकोनांतून " मला उद्ध्वस्त व्हायचंय " आणि " अंत:स्फोट " या कलाकृतींचा अभ्यास " या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधनकार्य माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या केले असून ते समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

ही प्रबंधिका यापूर्वी कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परिक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. (मराठी) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे. सदर प्रबंधिका आधुनिक मराठी साहित्य या अभ्यास क्षेत्रात समाविष्ट होते.

अर्जुननगर

दिनांक : 26.6.98

(प्र. डॉ. अच्युत वि. माने)
मार्गदर्शक

# प्र ति ज्ञा  प त्र

स्त्रीवादी दृष्टिकोनातून " मला उद्ध्वस्त व्हायचयं " आणि " अंत:स्फोट " या कलाकृतींचा अभ्यास या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फील(मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे.

ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

( श्री. विनायक गंगाधर चव्हाण )
अभ्यासक

# म नो ग त

एम. फिलचा प्रबंध सादर करित असतांना खरोखरच मनोमन मला आनंद होत आहे, कारण आई-वडीलांची इच्छा मी पूर्ण करु शकलो. ज्या उत्साहाने एम. ए. चे शिक्षण त्यांनी मला दिले तोच उत्साह त्यांचा माझ्या एम. फिल. होण्या बद्दलचा होता. आणि योगायोगाने ही सुवर्णसंधी देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर येथे मराठीचे एम. फिल. केंद्र सुरु झाल्याने मिळाली. पण एम. फिल. बद्दल मी अनभिज्ञ होतो व अवघडही वाटत होते. पण माझे मार्गदर्शक डॉ. अच्युत माने सर, आणि डॉ. पी. व्ही. कुलकर्णी सर, यांनी माझ्या मनांतील भिती नाहीशी करुन आत्मविश्वास निर्माण केला. स्त्रीवादी साहित्याच्या नव्या संकल्पनेची ओळख माने सरांनी करुन दिली. आणि या दृष्टिकोनांतून साहित्याच्या अभ्यासाची असणारी गरज व्यक्त केली. या अनुषंगाने पुस्तके निवडीत असतांनाच मलिका अमरशेख यांचे " मला उद्ध्वस्त व्हायचंय " आणि कुमुद पावडे यांचे " अंत:स्फोट " ही पुस्तके निवडली आणि"स्त्रीवादी दृष्टिकोनांतून"मला उद्ध्वस्त व्हायचंय" आणि " अंत:स्फोट " या कलाकृतींचा अभ्यास " हा विषय मी निवडला शिवाजी विद्यापीठाने सुध्दा या विषयाला मान्यता दिली. आणि माझ्या अभ्यासाला सुरवात झाली.

अभ्यासासाठी"मला उद्ध्वस्त व्हायचंय " हे पुस्तक सहजपणे मिळाले पण " अंत:स्फोट " हे पुस्तक मिळू शकले नाही. शेवटी आनंद प्रकाशन, औरंगाबाद येथे जाऊन माझे आजोबा श्री. शिवाजी माने यांना आणावे लागले. तसेच संदर्भ ग्रंथासाठीही अनेक ग्रंथालयात शोधाशोध करावी लागली. श्री. राम हायस्कूल नांगनूर, आजरा महाविद्यालय आजरा, साने गुरुजी वाचनालय, गडहिंग्लज व देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर येथील ग्रंथालयातून पुस्तके उपलब्ध झाली. यासाठी श्री. राम हायस्कूल, नांगनूर चे मुख्याध्यापक श्री. सुगते सर, आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एच. व्ही. देशपांडे व ग्रंथपाल श्री कुंभार सर, साने गुरुजी वाचनालयातील माझे मित्र काकासाहेब

भुईबंर व देवचंद महाविद्यालयातील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाचे फार मोठे सहकार्य व प्रोत्साहन लाभले त्याच बरोबरीने माझे परम मित्र श्री. प्रमोद कांबळे, श्री. आनंदा संकपाळ, श्री. संजय सितोळे, श्री. वजीर जंबाई व उत्तम सुर्यवंशी यांनीही या कामी फार मोठी मदत करुन माझे डोंगराएवढे ओझे हलके केले. खरोखरच त्यांचे आभार मानावे तितके कमिच आहे. याच बरोबरीने देवचंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. जे. कशाळीकर प्रा. रेंदाळकर सर, श्रीमती चुनामरी मॅडम, यांचेही वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शक लाभले. टंक लेखनाच्या कामात तत्परता दाखवून सौ. व श्री. चव्हाण यांनी मदत केली म्हणूनच मी हे काम पूर्ण करु शकलो. या सर्वांचा मी शतशः ऋणी आहे.